नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2024 (मंगळवार) दुपार

## कळमेश्वर येथील सट्टापट्टीवर
## —: विशेष पथक नागपुर ग्रामीणची कारवाई:—

मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशान्वये नागपुर ग्रामीण हद्दीत अवैध धंदयावर कार्यवाही करणेकामी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथक नागपूर ग्रामीण हे पो.स्टे. कळमेश्वर येथील स्टाफसह पोस्टे कळमेश्वर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना विश्वसनीय मुखबीर द्वारे खबर मिळाली की, मौजा चिचभवन १४ मैल लॉजीस्टीक फाटा गोडाउन परीसरात पानठेल्याचे बाजुला विठ्ठल काळे नावाचा इसम हा लोकांकडुन पैसे घेवुन त्यांनी सांगीतले आकडे कागदावर लिहुन सट्टापट्टी मटका जुगार खेळवित आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून यातील पोलीस स्टॉफसह मिळालेल्या खबरेच्या ठिकाणी मौजा चिचभवन १४ मैल फाटा लॉजीस्टीक गोडाउन जवळ पानठेल्याजवळ जावुन सापळा रचुन दि. ०८/०१/२०२४ चे १७.१५ वा. दरम्यान तेव्हा सट्टापट्टी बाबत खात्रीशीर खबरेनुसार नमुद घटनास्थळी आकडयाची सट्टापटी लावुन हारजितेचा जुगार खेळत असल्याचे दिसुन आल्याने नमुद घटनास्थळी **आरोपी नामे— १) विठ्ठल तुकारामजी काळे, वय ६० वर्ष, रा. वार्ड नं.२, पेठ ता. नागपुर जि. नागपुर, २) राजेन्द्र जाणबाजी सरवरे, वय ५२ वर्ष, रा. खापरी ता. कळमेश्वर जि. नागपुर** सदर इसम आकडयाची सट्टापट्टी लावुन हारजितचा जुगार खेळतांना व लोकांकडुन पैसे स्वीकारताना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन नगदी ३३१०/— रू व आरोपी क्र. १ याचे लावा कंपनीचा काळा रंगाचा साधा मोबाईल किंमती २,०००/— रू व आरोपी क्र. २ याचे विवो कंपनीचा पांढऱ्या रंगाचा ॲन्डाईड मोबाईल अंदाजे किंमती १०,०००/—रू. तसेच २ निळया शाईचे पेन किंमती १०/— रू. असा एकुण १५,३२०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १२(अ) मजूका सहकलम १०९, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचेरकर, पोलीस अंमलदार अतुल बांते मा. पोलीस अधिक्षक सा. विशेष पथक नागपूर ग्रामीण यांचे पथकाने केली.

# घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावर मौजा मासोद येथे दिनांक ०७/०१/२०२४ चे १९.०० वा. ते दिनांक ०८/०१/२०२४ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गोंविद भास्कर काळे, वय ४४ वर्ष, रा. कोंढाळी हे जिल्हा परिषद मासोद येथे शिक्षक असुन नेहमी प्रमाणे शाळा बंद करून गेले असता दि. ०८/०१/२०४ रोजी सकाळी शाळेत आले असता त्यांना शाळेचे स्टोअर रूम मध्ये ठेवलेले शालेय पोषणचे ६० किलो तांदुळ व १२ किलो मसुर दाळ किंमती २६१०/— रू. चा मुद्देमाल **आरोपी नामे— १) केशव बापुराव बोरकर, वय ४८ वर्ष २) विधीसंघर्ष बालक दोन्ही रा. मासोद** यांनी शाळेचे लोंखडी दाराचे कोंडा तोडुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपींविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक कामडी यांनी भेट दिली असुन आरोपी क्र. १) यास अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कामडी मो. नं. ९९२३१२३३९७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**